| MHKO140009152025 | **नियमित दिवाणी दावा क्र.२१४/२०२५ मधील**<br>**नि. ११ वरील आदेश**<br><br>श्री. श्रीकांत लक्ष्मण कदम<br>**वि.**<br>श्री. शंकर लक्ष्मण कदम, वगैरे. |
|---|---|

प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. नि.क्र.११ वर दाखल केलेल्या अर्जाद्वारे वादी हे वाद पत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागत आहे. सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे. सदर अर्जात वादी यांनी असे कथन केले आहे की, सदरचा दावा मे. कोर्टात प्रलंबित असताना व प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये बांधकाम करु नये अशी ताकीद व जैसे थे परिस्थीती ठेवणेचा ओदश असताना देखील प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये दांडगाव्याने बांधकाम करीत आहे, करीता सदरचा प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये केलेले बांधकाम मे. कोटातर्फे काढून घेणेबाबत आदेश होणेसाठी व तशी दुरुस्ती दाव्यात करुन मागत आहेत. सदर अर्जातील परिच्छेद 'अ' मध्ये मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास वादींना परवानगी मिळणे आवश्यक आहे. वादी पुढे कळवितात की, प्रस्तावित दुरुस्तीद्वारे दाव्याचे मूळ स्वरुप बदलणार नाही अथवा त्यायोगे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. अर्जासोबत वादी चे शपथपत्र जोडले आहे.

२. प्रतिवादी यांनी अर्जाच्या मागील मागे त्यांचे म्हणणे सादर करून अर्जास तीव्र हरकत घेतली आहे.

३. वादीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही. आर. पाटील यांचा व प्रतिवादींतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. व्ही. बी. कडुकर यांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुत दावा हा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादींनी वादपत्रामध्ये जी दुरुस्ती मागितली आहे ती मान्य होण्यास पात्र आहे किंवा कसे हे पाहण्यासाठी संबंधित कायद्याची तरतुद पाहणे आवश्यक ठरते.

५. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६, नियम १७ पुढीलप्रमाणे उध्दृत करते. :–

*''१७. न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोपैकी कोणत्याही पक्षकारास, त्याच्या वादकथनास न्याय्य असेल अशा रितीने व अशा अटींवर बदल करण्याची किंवा दुरुस्ती करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न अभिनिर्णित करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे अशा सर्व दुरुस्त्या केल्या पाहिजेत.*

*परंतु, वाजवी दक्षता बाळगुन सुध्दा, वादाची चौकशी आरंभ होण्यापूर्वी, तो पक्ष, अशी दुरुस्ती मागणी करु शकली नाही असे न्यायालय निष्कर्षाप्रत आल्याशिवाय, दाव्याच्या सुनावणीची सुरुवात झाल्यानंतर, असा दुरुस्तीचा अर्ज मान्य करता येणार नाही.''*

६. पक्षकारांचे कथन, नमुद तथ्य व मागणी केलेली याचना यांचा सारासार विचार करून अर्ज व अर्जातील मागणी योग्य त्या तरतुदीनुसार हाताळणे हे न्यायालयाचे कर्तव्य आहे. तांत्रिक दोषासाठी अर्ज निरसित करणे न्यायास धरून होणार नाही. त्यामुळे, वादींचा प्रस्तुत अर्ज संहितेचे क्रम ६, नियम १७ अन्वये मान्य करता येईल. अर्जातील विषय, निकड यांचा विचार करता अर्ज मान्य होण्यास पात्र आहे. सबब, निम्न आदेश.

## <u>आ दे श</u>

नि.क्र. ११ वरील वाद पत्र दुरुस्तीचा अर्ज पुढीलप्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

वादीने अर्जात मागणी केल्यानुसार वाद पत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

वादीने या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसाच्या आत उपरोक्त प्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करावी व दुरुस्ती दाव्याची प्रत व त्याच्या पुरेश्या प्रतींसह व हुकूमनाम्यासाठीच्या प्रतीसह अभिलेखावर दाखल करावे.

सही/-

दि. ११/०४/२०२६ (**व्ही. एस. अग्रवाल**)
चंदगड दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चंदगड